शनिवार दिनांक ०७/११/२०१५ रोजी सकाळी ०१.०० वाजता बांधकाम समिती सभागृह जि.प.सातारा येथे झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत

| सभेची तारीख व वेळ | उपस्थित असलेल्या सभासदाची नावे | |
|---|---|---|
| शनिवार दिनांक ०७/११/२०१५ रोजी दुपारी १.०० वाजता | १) मा.श्री.साळुंखे प्रदीप उर्फ रवि सुर्यकांत | सभापती |
| | २) मा.श्री.भोसले राजू अनिल | सदस्य |
| | ३) मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र | सदस्या |
| | ४) मा.श्री.कदम राहूल बबनराव | सदस्य |
| | ५) मा.श्री.पवार शशिकात निवृत्ती | सदस्य |
| | ६) मा.श्री.जाधव सदाशिव यशवंत | सदस्य |
| | ७) मा.सौ.घाडगे सावित्रा मानाजी | सदस्या |
| | ८) मा.सौ.शिंदे राधाबाई दिनकर | सदस्या |
| | ९) मा.श्री.जयवंत दिनकर जगताप | सदस्य |

सर्व संबधितांचे उपस्थितीमध्ये मा.सभापती बांधकाम समिती जिल्हा परिषद सातारा यांचे परवानगीने सभेचे कामकाजास सुरुवात झाली.

विषय क्रं.१ :- दिनांक १३.१०.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणे.

ठराव क्रं.२१६ :- दिनांक १३.१०.२०१५ रोजी झालेल्या बांधकाम समिती सर्वसाधारण सभेचा कार्यवृत्तांत वाचून कायम करणेत आला.

सूचक :- मा.जाधव सदाशिव दिनकर
अनुमोदकः- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

**ठराव सर्वानुमते मंजूर**

विषय क्रं.२ :- विविध योजनांच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणे.

ठराव क्रं. २१७ :- विविध योजनेच्या कामांचा तालुकानिहाय आढावा घेणेत आला. तसेच कामे मुदतीत पूर्ण होण्याच्या दृष्टीने उप अभियंता यांना आवश्यक त्या सूचना देणेत आल्या.

सूचक :- मा.श्री.पवार शशिकांत निवृत्ती
अनुमोदक :- मा.सौ.राधाबाई दिनकर शिंदे

ठराव सर्वानुमते मंजूर

**ऐनवेळचा विषय 3** मांढरदेव पालन रस्ता ग्रामा 50 सुधारणा करणे ता.वाई सा.क्र.2/490 ते 2/700 ता.वाई जि.सातारा_या कामाची निविदा स्विकृतीस मंजूरी देणेबाबत विचार करणे..

**ठराव क्र.** २१८ 3054 मार्ग व पूल जिल्हा व इतर मार्ग या शिर्षकाखाली मांढरदेव पालन रस्ता ग्रामा 50 सुधारणा करणे ता.वाई सा.क्र.2/490 ते 2/700 ता.वाई जि.सातारा या कामाची निविदा र.रु 24,12,843/- ची निविदा

http://mahatenders.gov.in संकेतस्थळावर दिनांक 14/10/2015 **ते 28/10/2015** रोजी ई-निविदा प्रसिध्द करण्यात आली होती. सदर कामाचा दुसरा लखोटा दिनांक **30/10/2015** रोजी दराचा लखोटा उघडला असता मे.सार्थक कन्स्ट्रकशन, सातारा यांची अंदाजपत्रकीय रक्कमेपेक्षा (+) 5.76 टक्के जादा दराने परंतु तुलेनेने सर्वात कमी दराची निविदा प्राप्त झाली. मे.सार्थक कन्स्ट्रकशन, सातारा यांना दर कमी करणेबाबत कळविले असता संबधीत मक्तेदाराने दि. 04/11/2015 रोजीचे पत्रान्वये 4.18टक्के जादा दराने म्हणजेच र.रु.24,92,327/- ने सदरचे काम करणेस तयार असलेचे कळविले आहे तरी र.रु 24,92,327/- ही सर्वात कमी दराची निविदा असल्याने महाराष्ट्र शासन ग्राम विकास व जलसंधारण विभाग शासन निर्णय क्र.झेडपीए-20 /प्र.क्र -680/वित्त-9 दिनांक 31जानेवारी 2013 नुसार सदरची निविदा स्विकृती मान्यता देणेत येत आहे.

सूचक :- मा.सौ.पाटील सुरेखा महेंद्र
अनुमोदक :- मा.श्री.पवार शशीकांत निवृत्ती

.ठराव सर्वानुमते मंजूर

**ऐनवेळचा विषय क्रं.४-** श्री.दत्त मंदिर संस्थान, मोर्वे या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्री निवास बांधणे (स्त्री) ता.खंडाळा जि.सातारा या कामाची ई निविदा स्विकृतीस मान्यता देणे बाबत विचार करणे.

**ठराव क्रमांक- २१९** श्री.दत्त मंदिर संस्थान, मोर्वे या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्री निवास बांधणे (स्त्री) ता.खंडाळा जि.सातारा श्री.दत्त मंदिर संस्थान मोर्वे या तीर्थक्षेत्राच्या ठिकाणी यात्री निवास बांधणे (स्त्री) ता.खंडाळा जि.सातारा हे काम ई निविदा दिनांक २८/८/२०१५ रोजी प्रसिध्द करणेत आली. असता ५ मक्तेदार यांनी ई निविदा सादर केल्या होत्या सर्वच मक्तेदारानी कमी दराने ई निविदा भरली होती. त्यापैकी श्री.संजय ज्ञानेश्वर धायगुडे रा.अंदोरी ता.खंडाळा जि.सातारा यांचा दर इतर चार मक्तेदारांपेक्षा कमी परंतु अंदाजपत्रकीय दरापेक्षा (-) १२.७५ टक्के कमी दराने आहे. लखोटा क्रमांक २ दिनांक १९/९/२०१५ रोजी शासनाच्या वेबसाईटवर पाहिला असता त्यांची ब-१ निविदा मक्तेदारानी जाहिर निविदेतील अटीनुसार सर्व कागदपत्रे पुर्ण असल्याने श्री.संजय ज्ञानेश्वर धायगुडे रा.अंदोरी ता.खंडाळा जि.सातारा यांची अंदाजपत्रकीय रकमेपेक्षा (-) १२.७५ टक्के कमी दराची रक्कम रुपये २१४८३७४/- ची ई निविदा सर्वात कमी दराची असुन ती स्विकृतीस पात्र आहे.महाराष्ट्र शासन, ग्रामविकास व जलसंधारण विभाग, शासन निर्णय क्रमांक झेडपीए २०१२/प्र.क्र.६८०/वित्त-९ मंत्रालय मुंबई दि.३१ जानेवारी २०१३ अन्वये रक्कम रुपये २३,००,००१/- ते ३०,००,०००/- पर्यंत रकमेची बांधकामे/विकास योजनांच्या निविदा स्विकृतीचे अधिकार जिल्हा परिषद बांधकाम समिती सभेस आहे. त्यानुसार